आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

बुधवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. 'मेक इन इंडिया' मुळे अर्थव्यवस्था मजबूत झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन; आत्मनिर्भर भारत बनवण्याचा निर्धार.
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर, २२ हजार ६०० कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण तसंच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचं करणार भूमीपूजन.
3. न्यायालयाचा निकाल माझ्या सारख्या दुखावलेल्या मागासवर्गीय लोकांसाठी दिशादर्शक असल्याची जात पडताळणी प्रमाणपत्र निकालावर रश्मी बर्वे यांची प्रतिक्रिया.
4. स्वच्छता मोहिमेला राष्ट्रीय पातळीवर नेत वाशिमच्या भुली ग्रामस्वच्छता महिला मंडळाने शरयु नदीच्या घाटावर राबविले स्वच्छता अभियान.

****

मेक इन इंडिया

'मेक इन इंडिया' मुळे विविध क्षेत्रातली निर्यात वाढली, उत्पादन क्षमतेचा विकास झाला आणि अर्थव्यवस्था मजबूत झाल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. मेक इन इंडिया उपक्रमाला आज १० वर्षे झाली. त्यानिमित्त समाजमाध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये मोदी यांनी देशवासियांचं कौतुक केलं आहे. सुधारणांच्या मार्गावर देशाची प्रगती सुरू राहील आणि एकत्रितरित्या आपण आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गुंतवणूक वाढवणं, संशोधनाला चालना देणं, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणं तसंच उत्पादन, आरेखन आणि नवोन्मेष या क्षेत्रात देशाला आघाडीचं स्थान मिळावं यासाठी सरकारनं 'मेक इन इंडिया' हा उपक्रम सुरू केला होता.

पंतप्रधान पुणे दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या पुणे दौऱ्यावर आहेत. त्यांच्या हस्ते २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या विविध प्रकल्पांचं भूमीपूजन आणि लोकार्पण होणार आहे. या दौऱ्यात ते जिल्हा न्यायालय ते स्वारगेट मेट्रोला हिरवा झेंडा दाखवतील. तसंच

स्वारगेट-कात्रज मेट्रोची पायाभरणी करतील. पंतप्रधानांच्या हस्ते भिडे वाड्यातल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाचं भूमीपूजनही होणार आहे. तसंच ते ३ परम रुद्र संगणकांचं लोकार्पण करतील.

****

रश्मि बर्वे

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीद्वारे चांभार अनुसूचित जातीचे वैधता प्रमाणपत्र रद्द केले गेल्यानंतर लोकसभा निवडणूक लढण्यास अपात्र ठरलेल्या काँग्रेस नेत्या रश्मी बर्वे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने काल क्लीन चिट दिली. दरम्यान 'हायकोर्टाने दिलेला निकाल माझ्या सारख्या दुखावलेल्या मागासवर्गीय लोकांना निश्चितच मार्ग दाखवेल,अशी अपेक्षा आज रश्मी बर्वे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी ज्या प्रकारे संविधानाची अवहेलना केली, त्यामुळे लोकशाहीसाठी फार मोठे संकट निर्माण झालेले आहे. विदर्भाच्या प्रत्येक विधानसभा क्षेत्रात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी सर्व प्रयत्न मी करेल असं माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रश्मी बर्वे यांनी सांगितलं. दरम्यान, रेकॉर्डवरील ठोस पुरावे लक्षात घेता बर्वे यांचा चांभार अनुसूचित जातीचा दावा सिद्ध होत असल्याचे जाहीर करून त्यांना एक आठवड्यात वैधता प्रमाणपत्र जारी करा, असा आदेश हायकोर्टाने समितीला दिला. तसेच, बेकायदेशीर कृती केल्यामुळे समितीवर एक लाख रुपये दंड न्यायालयाने ठोठावला असून ही रक्कम बर्वे यांना अदा करण्याचे निर्देश दिले आहे.

****

न्यायवृंद

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील न्यायवृंदाने मुंबई उच्च न्यायालयातल्या ९ ज्येष्ठ वकिलांच्या नावाची शिफारस न्यायाधीशपदासाठी केली आहे. यात नागपूरच्या निवेदिता महेता, प्रफुल्ल खुबाळकर आणि रोहित जोशी यांचा समावेश आहे. याशिवाय अन्य सदस्य राजेश दातार, सचिन देशमुख, गौतम अंखड, महेंद्र नेर्लीकर, ,आश्विन भोबे, आणि अद्वेत सेठना हे असतील.

****

किरेन रिजिजू/१०० दिवस

वक्फ (दुरुस्ती) विधेयकाचा आढावा घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेली संसदेची संयुक्त समिती आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात आपला अहवाल सादर करू शकेल, अशी आशा अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी व्यक्त केली आहे. समितीकडे आतापर्यंत एक कोटींहून अधिक सूचना आल्याचं त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातिल सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील **100** दिवसात अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाच्या उपलब्धीबद्दल प्रसारमाध्यमांना माहिती देताना रिजिजू म्हणाले की, यासंदर्भात व्यापक चर्चा सुरू आहे आणि समिती विविध सरकारी आणि सामाजिक संस्थांकडून कल्पना आणि सूचना मागवत आहे. **100** दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयानं यावर्षी दिल्ली हाट इथ लोकसंवर्धन पर्व आयोजित केलं आहे.सरकारनं **2024-25** या आर्थिक वर्षात दोन लाख **50** हजाराहून अधिक लाभार्थ्यांना **1,000** कोटी रुपयांहून अधिक कर्ज दिलं आहे. हज यात्रेकरूंसाठी हज सुविधा ॲप सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

****

पंडित दीनदयाल उपाध्याय जयंती

पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती आज सर्वत्र विविध उपक्रमांनी साजरी होत आहे. यानिमित्त आज नागपुरात हिंदी मोरभवन इथं कवी दयाशंकर तिवारी 'मौन' लिखित 'मां भारती के सारथी दीनदयाल उपाध्याय' या पुस्तकाचे प्रकाशन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते आज झालं. यावेळी शिक्षणतज्ज्ञ डॉ. वेदप्रकाश मिश्रा, माजी महापौर दयाशंकर तिवारी उपस्थित होते. पंडित दीनदयाल उपाध्याय जयंतीनिमित्त मंत्रालयात आज अंत्योदय दिवस साजरा करण्यात आला. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दीनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. आज नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात, संत गाडगे बाबा अमरावती विदयापीठ, महाराष्ट्र सदन, महाराष्ट्र परिचय केंद्र आणि विविध खाजगी आणि सरकारी संस्थांमध्ये देखील त्यांची जयंती साजरी करण्यात आली.

****

बदलापूर बाल अत्याचार

बदलापूर बाल अत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काउंटर प्रकरणी, मुंबई उच्च न्यायालयानं 'ही चकमक नाहीच,' असं मत व्यक्त

केलं आहे. न्यायमूर्ती रेवती मोहिते- डेरे, आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठानं पोलिसांवर आज प्रश्नांची सरबत्ती केली. गोळीबाराच्या बाबतीत प्रशिक्षित असलेले पोलिस आरोपीला आवरु शकले नाहीत, यावर कसा विश्वास ठेवायचा? या घटनेच्या दृश्यांमधे फेरफार टाळण्यासाठी ते सिल केलं आहे का, या घटनेतलं शस्त्र पिस्तुल होतं, की रिव्हॉलवर, असे प्रश्न न्यायालयानं विचारले. या चकमकीनंतर पोलिसांनी काय पावलं उचलली याची विचारणा देखील न्यायालयानं केली. या प्रकरणी पोलिसांविरुद्ध गुन्हा नोंदवला जावा, तसंच या घटनेशी संबंधित सीसीटिव्ही चित्रण सुरक्षित ठेवलं जावं, अशी मागणी अक्षय शिंदेच्या वडलांच्या वकीलांनं आजच्या सुनावणी दरम्यान केली.

****

स्वच्छता ही सेवा

वाशीम जिल्ह्यातील, मानोरा तालुक्यातील, भुली इथल्या ग्रामस्वच्छता महिला मंडळानं स्वच्छतेच्या संकल्पाला पुढे नेत अयोध्येतील शरयु नदीच्या घाटावर स्वच्छता अभियान राबवलं. 'स्वच्छता ही सेवा' या पंधरवाड्यानिमित्त आयोजित या उपक्रमात ५१ महिलांनी सहभाग घेतला. भुलीचे ग्रामस्वच्छता महिला मंडळ हे परराज्यात जाऊन स्वच्छता अभियान राबवणारे वाशीम जिल्ह्यातील पहिलेच पथक आहे. त्याचप्रमाणे 'स्वभाव स्वच्छता- संस्कार स्वच्छता' अंतर्गत वाशिमच्या नेहरू युवा केंद्र आणि केकतउमराच्या युवा बहुउद्देशीय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानं वाशिम शहरातील धार्मिक स्थळांची आणि महापुरुषांच्या पुतळ्यांची स्वच्छता करण्यात आली. नागपूरच्या परकीय व्यापार महासंचालनालय म्हणजे (**DGFT**) च्या वतीनं स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली आहे. समाजात स्वच्छतेच्या सवयी जागृत करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हा या मोहिमेचा उद्देश असून **DGFT** चे सह महासंचालक प्रवीण कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली डीजीएफटी च्या कर्मचार्यांनी ठिकठिकाणी स्वच्छतेच्या कामात सहभाग घेतला. भारतीय माहिती तंत्रज्ञान संस्था नागपूर इथं देखील "स्वच्छता ही सेवा २०२४" हा पंधरवडा साजरा केला जात आहे. या अंतर्गत ट्रिपल आयटीच्या विद्यार्थ्यांनी जवळच्या वारंगा गावाला भेट दिली. या शिवाय संस्थेतर्फे विविध स्पर्धा, आरोग्य तपासणी शिबिर, व्याख्यान, विद्यार्थी संवाद सत्र घेण्यात आले.

****

'एक पेड़ माँ के नाम'

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशानुसार 'एक पेड़ माँ के नाम' या मोहिमेअंतर्गत आज राजगुरू आणि चंद्रशेखर आझाद वसतिगृहाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं. या मोहिमेत शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विविध प्रजातींची रोपे लावली. दरम्यान, नागपुरात अजनी रेल्वे परिसरात नवीन पार्किंग आणि विविध प्रस्तावित बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या झाडांची नागपूर महानगरपालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी यांनी आज रेल भूमी विकास प्राधिकरण, वृक्षप्राधिकरण समितीचे सदस्य आणि स्वच्छ असोसिएशनच्या प्रतिनिधीं सोबत पाहणी केली. यावेळी त्यांनी विकास कामात अडथळा निर्माण करणाऱ्या हेरिटेज वृक्षांची कापणी करण्याऐवजी त्यांचं संरक्षण करण्याचे स्पष्ट निर्देश रेल भूमी विकास प्राधिकरणला दिले.

****

सामंजस्य करार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परीक्षेत्रात येत असलेल्या नागपूर, गोंदिया, भंडारा आणि वर्धा इथल्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी तसंच स्थानिक नागरिकांसाठी आयटी आणि फॅशन डिझाइनचे प्रमाणपत्र आणि प्रगत प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवून विद्यार्थ्यांसह स्थानिक नागरिकांच्या कौशल्यात वाढ करण्यासाठी विद्यापीठानं समता फाउंडेशन सोबत सामंजस्य करार केला आहे. या उपक्रमामुळ विद्यार्थ्यांना करिअरमध्ये प्रगतीची संधी मिळेल, त्यासोबतच स्वयंरोजगार निर्माण करण्याच्या दिशेनं महत्त्वाचे पाऊल उचललं जाईल, असा विश्वास कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी व्यक्त केला.

****

हवामान

विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशीम आणि गडचिरोली मध्ये आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट जरी करण्यात आला आहे. दरम्यान वाशीम जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीने **19** सप्टेंबर पर्यंत **531.19** हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, **641** शेतकऱ्यांना शासनाकडून **72** लाख **55** हजार रुपये मदत मंजूर करण्यात आल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीने दिली आहे.

******